महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ 01 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 245 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024




थोडक्यात महत्वाचे




## केडीएमसी मार्फत दिव्यांगांसाठी क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महापालिकेच्या समाज कल्याण विभागामार्फत दि.1 मार्च व 2 मार्च रोजी दिव्यांग व्यक्तींसाठी क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन, शनिवार दिनांक 1 मार्च 2025 रोजी नानासाहेब फडके क्रीडा संकुल, लालचौकी कल्याण (प) येथे महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांच्या शुभहस्ते सकाळी 11.00 वाजता संपन्न होणार आहे. या स्पर्धांमध्ये सुमारे 200 पेक्षा जास्त दिव्यांग व्यक्ती सहभागी होणार आहेत.या क्रीडा स्पर्धांमध्ये बुद्धिबळ, कॅरम अशा बैठ्या खेळांचा अंतर्भाव असून मैदानी क्रीडा स्पर्धांमध्ये गोळा फेक,नेमबाजी, व्हीलचेअर स्पर्धा ,धावणे इ. स्पर्धांचा अंतर्भाव राहील.दिनांक 2 मार्च रोजी आचार्य अत्रे रंगमंदिर येथे दिव्यांग व्यक्तींसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल रहाणार असून सांस्कृतिक कार्यक्रमांचे संपूर्ण सादरीकरण दिव्यांग व्यक्तींमार्फतच केले जाणार आहे.

सांस्कृतिक कार्यक्रमांचा शुभारंभ दिनांक 2 मार्च रोजी सकाळी 11.00 वाजता अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यासाठी दिव्यांग कलाकार मोठ्या हुरूपाने सांस्कृतिक कार्यक्रमांचा सराव करीत आहेत.

महापालिका आयुक्त डॉ इंदु राणी जाखड यांच्या संकल्पनेनुसार आणि समाज कल्याण विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी पेन्शन,थेरेपी सेंटर, व्यवसाय अर्थसहाय्य, विवाह अर्थसहाय्य ,शैक्षणिक शिष्यवृत्ती , खेळाडू शिष्यवृत्ती अशा अनेकविध सुविधा महापालिकेमार्फत देण्यात येत आहेत.

## जीवनदीपमध्ये मराठी राजभाषा दिन साजरा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** भारत हा विविधतेने नटलेला देश आहे आणि आपल्या देशात विविध भाषिक लोक राहतात. भाषा हे संवादाचे एक माध्यम आहे त्यातीलच एक भाषा मराठी. जिला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे.अनेक लेखकांनी मराठी भाषेत आपले लेखन करून या भाषेला साहित्यिक वारसा मिळवून दिलाआहे.

कुसुमाग्रज म्हणजेच वि.वा. शिरवाडकर यांचं मराठी भाषेसाठी च योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे आणि म्हणूनच त्यांचा जन्मदिवस म्हणजेच 27 फेब्रुवारी हा दिवस सर्वत्र मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे देखील हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे यांनी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस पूजन करून समस्त मराठी लेखकांचे स्मरण करून विद्यार्थ्यांना आपल्या सांस्कृतिक वारशाचे जतन करण्यास प्रोत्साहित केले.

या दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये आपल्या संस्कृतीची जाणीव करून देण्याकरिता त्याचबरोबर आपल्या आजूबाजूच्या लोकांमध्ये मराठी भाषेचे महत्व लक्षात आणण्यासाठी मराठी साहित्यातील अभंग,ओव्या गात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गावांमध्ये दिंडी काढून जनजागृती केली. यावेळेस जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे, प्राचार्य.के.बी कोरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.महेश थोरात तसेच सर्व प्राध्यापक प्राध्यापिका आणि विद्यार्थी उपस्थित होते.



# नराधम दत्तात्रय गाडेला बारा दिवसांची कोठडी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पुणे :** पुण्यातील स्वारगेट एसटी स्थानकावर उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये एका २६ वर्षीय तरुणीवर मंगळवारी पहाटे साडेपाचच्या सुमारास बलात्कार झाला. बलात्कारानंतर हा आरोपी जवळपास तीन दिवस पोलिसांना चकवा देत होता. अखेर सीसीटीव्ही फुटेज, श्वान पथक आणि ड्रोनच्या सहाय्याने पोलिसांनी आरोपीला गुणाट या गावातून मध्यरात्री अटक केली. यानंतर आरोपीला आज पुणे सत्र न्यायालयासमोर हजर करण्यात आले. दरम्यान या प्रकरणाच्या पुढील तपासासाठी आरोपीला पुणे न्यायालयाने १२ दिवसांची पोलिस कोठडी दिली आहे.

पुण्यातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या स्वारगेट बसस्थानकात महिलेवर अत्याचार झाल्याची घटना उजेडात आल्यानंतर याविरोधात सर्व स्तरांमधून संताप व्यक्त केला जात होता. विरोधकांकडून राज्य सरकार आणि पोलीस प्रशासनावर टीका केली जात होती. या दरम्यान आरोपी दत्तात्रय गाडे याला अटक करण्यात पोलिसांना यश आले.

"शेवटच्या माहितीवरून आम्ही आरोपीला पकडलं. शेवटची माहिती आली की तो कुठेतरी पाणी पिण्यासाठी आला होता. तो कोणालातरी दिसला आणि मग तो तिथून पळाला. ड्रोनच्या सहाय्याने जी दिशा दिसली, त्यातून त्याला अटक करण्यात आली. ज्याने शेवटची माहिती दिली, त्याला एक लाखांचं बक्षिस देण्यात येणार आहे. त्याव्यतिरिक्त गावासाठी काय करता येणार, याचाही आम्ही विचार करणार आहोत", असेही अमितेश कुमार यावेळी म्हणाले.

**"एसटी स्थानकातील २३ सीसीटीव्ही कॅमेरा आणि स्थानकाबाहेरील ४८ सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर दीड ते दोन तासांत आम्ही आरोपीची ओळख पटवली होती. गेल्या दोन दिवसांपासून आम्ही आरोपीच्या गावात जावून शोधमोहिम घेत होतो. पण आरोपी तेव्हा सापडला नाही. अखेर तो आज सापडला आहे. याकरता मी गावातील नागरिकांचे धन्यवाद देतो. त्या गावात भेट देऊन नागरिकांचा सत्कार करणार आहोत. तिथे ज्या-ज्या लोकांनी मदत केली, त्यांचं विशेष अभिनंदन करणार आहोत", असं पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार भावना आरोपीच्या अटकेनंतर व्यक्त केली.**

### आरोपीकडून आत्महत्येचा प्रयत्न

पुणे बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे याने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती समोर येत आहे. या संदर्भात बोलताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "असं आहे की या प्रकरणातील सर्व गोष्टी तपासात समोर आल्यानंतर त्यावर सविस्तर बोलणं योग्य आहे. आता पोलिसांनी आरोपीला अटक केलं आहे. त्यानंतर आरोपीला आज न्यायालयात हजर केलं जाईल. त्यानंतर आरोपीची चौकशी होईल. तसेच काही टेक्निकल डिटेल्स आमच्याकडे आलेल्या आहेत. तसेच काही फॉरेन्सिक डिटेल्स देखील आलेल्या आहेत. याची सर्व माहिती एकत्र करून याबाबत बोलणं योग्य राहील."



### १०० दिवसांच्या विशेष मोहिम
## अंतरिम प्रगती मूल्यमापनात ठाणे पालिकेची आघाडी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणेः** राज्यस्तरीय, विभागस्तरीय व जिल्हास्तरीय प्रशासन हे लोकाभिमुख, गतिमान व पारदर्शक पद्धतीने चालावे याकरिता ७ जानेवारी, २०२५ ते १६ एप्रिल, २०२५ या कालावधीत राज्यात १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेच्या अंतरिम प्रगतीच्या मूल्यमापनामध्ये राज्यातील सर्व महानगरपालिका आयुक्त कार्यालयांमधून ठाणे महानगरपालिका आयुक्त कार्यालयास राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे.

या मोहिमेच्या अंतरिम प्रगतीचा आज, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या उपस्थिती सह्याद्री अतिथीगृह येथे आढावा घेण्यात आला.

या अंतरिम प्रगतीच्या मूल्यमापनामध्ये राज्यातील सर्व महानगरपालिका आयुक्त कार्यालयांमधून ठाणे महानगरपालिका आयुक्त कार्यालयास राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. त्याबद्दल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत देण्यात आलेले 'अभिनंदन पत्र' ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी स्वीकारले.

दिनांक १६ एप्रिल, २०२५ रोजी ही १०० दिवसांची विशेष मोहीम पूर्ण होणार आहे. ही मोहीम यापुढे अधिक व्यापक व प्रभावीपणे राबवून, आपल्या हातून अशीच नेत्रदीपक कामगिरी होत राहावी, अशी अपेक्षाही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.


राज्यातील सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, आयुक्त, संचालक, पोलीस आयुक्त, विभागीय आयुक्त, पोलीस परिक्षेत्र महानिरीक्षक, उप महानिरीक्षक, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कामगिरीचे कार्यालयांची संकेतस्थळे, सुकर जीवनमान, स्वच्छता, तक्रार निवारण, अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी, कृत्रीम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI), नाविन्यपूर्ण उपक्रम, इत्यादी निकषांच्या आधारे मूल्यमापन करण्यात आले.

# विरोधी पक्षनेते पदावर ठाकरे गटाचा दावा ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** ठाकरेंची शिवसेना लवकरच विरोधी पक्षनेते पदाचा दावा विधानसभा अध्यक्षांकडे करणार आहे. आज मातोश्रीवर आमदारांची बैठक झाली. या बैठकीमध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशनात पक्षाशी रणनीती आणि विरोधी पक्ष नेते पदासंदर्भात चर्चा झाली आहे. विरोधी पक्षनेते पदासाठी भास्कर जाधव, आदित्य ठाकरे आणि सुनील प्रभू यांच्या नावावर विचार झाल्याची माहिती मिळत आहे. अनुभव आणि विषय मांडण्याची आक्रमकता पाहता भास्कर जाधव यांचं नाव विरोधी पक्षनेते पदासाठी आघाडीवर असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.


विरोधी पक्षनेते पदा संदर्भात विधानसभा विधान परिषद आमदारांसोबत तासभर उद्धव ठाकरे यांनी चर्चा केली आहे. आपणच आपल्यापैकी नाव विरोधी पक्षनेते पदासाठी सांगावं असं उद्धव ठाकरे यांनी आपल्या आमदारांना सांगितलं आहे. मात्र, पक्षप्रमुख म्हणून उद्धव ठाकरे जो निर्णय घेतील सर्व आमदारांना मान्य असेल असं मत बैठकीत आमदारांकडून व्यक्त करण्यात आलं आहे. विरोधी पक्षनेते पदासाठी ठाकरेंच्या शिवसेनेकडून दावा केला जात असताना नाव जरी समोर आलं नसलं तरी पत्रावर सर्व आमदारांच्या सह्या घेण्यात आल्या आहेत. दरम्यान, विरोधी पक्षनेता नेमकं कोण होणार याचा निर्णय अद्याप झाला नसला तरी भास्कर जाधव, आदित्य ठाकरे आणि सुनील प्रभू यांची नावं आघाडीवर आहेत.



### महाविकास आघाडीतील मित्रपक्षांनांही विश्वासात घेणार

विरोधी पक्षनेते पदासाठीच ठाकरेंच्या शिवसेनेकडून पत्र लवकरच विधानसभा अध्यक्षांना देण्यात येणार आहे. विरोधी पक्षनेते पदावर ठाकरेंच्या शिवसेनेकडून दावा सांगत असताना महाविकास आघाडीतील मित्रपक्ष राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष आणि काँग्रेस या दोन पक्षांना सुद्धा विश्वासात घेतलं जावं यासंदर्भात नेत्यांमध्ये चर्चा झाली आहे. त्यामुळे मित्र पक्षांसोबत सुद्धा ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते चर्चा करणार आहेत. विधानसभा विरोधी पक्षनेते पदावर दावा करत असताना विधान परिषद विरोधी पक्षनेते संदर्भात काय करायचं यावर सुद्धा उद्धव ठाकरे यांनी आपल्या आमदारांसोबत चर्चा केली आहे. सोबतच राज्यातील सध्याचे विषय खास करुन सर्वसामान्यांच्या अडचणी मुंबई आणि ग्रामीण भागातील विषय या सगळ्या संदर्भात अर्थसंकल्पीय अधिवेशनात कोणते नेमके महत्त्वाचे विषय मांडायचे यावर आमदारांसोबत चर्चा झाल्याची माहिती मिळाली आहे.

# अंबरनाथची कचराकोंडी सुटली



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथः** आज अखेर सहाव्या दिवशी अंबरनाथमधील कचराकोंडी दूर झाली असून कचरा उचलून नेल्याने कचऱ्याचे ढिगारे उचलले आहेत. कचरा उचलून नेणाऱ्या कंत्राटी कामगारांना वेतन न मिळाल्याचे कारण पुढे करत कचरा संकलन करणाऱ्या घंटागाडी कामगारांनी बंद पुकारला होता. त्यामुळे शहरात व इमारतीच्या खाली कचऱ्याचे ढीग साचले होते.

अखेर सहा दिवसांनंतर घंटागाडी चा संप मिटला आहे. महाशिरात्रीत देखील शहरात कचऱ्याचे ढीग साचल्याने नागरिकांनी पालिकेला दूषणे दिली. अंबरनाथ शहरातील साधारण १६० मे टन घनकचरा व्यवस्थापनासाठी अंबरनाथ नगरपरिषदेने पुढील पाच वर्षासाठी नव्याने तब्बल ८० कोटी २५ लाख रुपयांचे टेंडर प्रसिद्ध केले आहे. हे काम समीक्षा कंपनीकडून केले जात आहे. मात्र टेंडरमधील अटी,शर्तीनुसार काम होत नसल्याचे कारण पुढे करत अंबरनाथ नगर परिषदेने मागील सहा महिन्यांचे बिल संबंधित ठेकेदारांना अदा केलेले नाही. त्यामुळे कामगारांचे पैसे दर महिन्याला त्यांच्या खात्यात ठेकेदाराने जमा केले आहेत. मागील एक महिन्याचा पगार न मिळाल्याने . कामगारांनी काम बंदचे हत्यार उपसले आहे. त्यामुळे तब्बल सहा दिवस शहरात कचरा साचलेला होता. अखेर ठेकेदाराचे तीन महिन्याचे बिल अदा करण्याचे नगरपालिकेने मान्य केल्यानंतर व कामगारांचे थकलेला एक महिन्याचा पगार ठेकेदाराने दिल्यानंतर सहा दिवसानंतर घंटा गाडी सुरू झाल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

# उन्हाच्या तडाख्यातून विद्यार्थ्यांची सुटका! जि.प. शाळेच्या वेळेत बदल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** तप्त उन्हामुळे अंगाची लाही लाही होत असून त्याचा आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे. आज मितीस तब्बल ४० अंशापर्यंत पारा पोहचला असून पुढील दोन महिन्यांत यात कमालीची वाढ होण्याची शक्यता असल्याने शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याला होणारा धोका लक्षात घेत ठाणे जिल्हा परिषदेने शाळेच्या वेळेत बदल केला आहे. दुपार सत्रात होणाऱ्या सर्वच शाळा आता सकाळ सत्रात होणार असल्याने विद्यार्थ्यांची उन्हाच्या तडाख्यातून सुटका होणार आहे. ठाणे जिल्हापरिषदेच्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांसह शिक्षकांनाही दिलासा मिळाला आहे. ठाणे जिल्हापरिषदेच्या एकूण एक हजार ३२८ शाळा असून पहिली ते आठवी पर्यंत तब्बल ८० हजार ९९१ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पूर्वीच्या परिपत्रकानुसार ठाणे जिल्हा परिषदेच्या शाळांची वेळ सकाळी १० : २० ते संध्याकाळी पाच पर्यंत होती. मात्र फेब्रुवारी महिन्यातच उन्हाचे चटके जाणवू लागले असून एप्रिल व मे महिन्यात पारा कमालीचा वाढलेला असतो. त्यामुळे जिल्ह्यात उष्णतेचा तडाखा सोसावा लागतो तसेच समुद्र जवळ असल्याने हवेतील आद्रतेमुळे उकाड्याचे प्रमाणही अधिक असते. त्यातच अनेक जिल्हा परिषद शाळांना पत्र्याचे शेड आहेत. उन्हाची तीव्रता आणि उकाड्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. ही बाब लक्षात घेऊन राज्यातील बहुतांश जिल्हा परिषदांनी शाळेच्या वेळेत बदल केला असल्याने ग्रीष्म काळात या जिल्हा परिषदांच्या शाळा सकाळी ७.३० पासून सकाळ सत्रात भरविल्या जात आहेत.

या पार्श्वभूमीवर खासदार सुरेश बाळ्या मामा म्हात्रे व प्राथमिक शिक्षक समितीचे अध्यक्ष विनोद लुटे यांनी शाळा सकाळच्या सत्रात सुरू करण्याची मागणी केली होती. त्यानुसार विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. १५ मार्च पासून ठाणे जिल्हापरिषदेच्या शाळा सकाळी सात ते दुपारी १२ : ३० पर्यंत भरविल्या जाणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले. यामुळे रखरखीत उन्हाच्या तडाख्यापासून विद्यार्थ्यांचे संरक्षण होणार आहे.



# गीतासार



**ज्ञानकर्मसंन्यासयोगः**

श्रीभगवानुवाच इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् । विवस्वन्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥ ४-१ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, मी हा अविनाशी योग सूर्याला सांगितला होता. सूर्याने आपला पुत्र मनू याला सांगितला आणि मनूने त्याचा पुत्र राजा इक्ष्वाकू याला सांगितला. ॥ ४-१ ॥

एवं परम्पराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः । स कालेनेह महता योगो नष्टः परन्तप ॥ ४-२ ॥

हे परंतपा (अर्थात शत्रुतापना अर्जुना), अशा प्रकारे परंपरेने आलेला हा योग राजर्षींनी जाणला. परंतु त्यानंतर पुष्कळ काळापासून हा योग या पृथ्वीवर लुप्तप्राय झाला. ॥ ४-२ ॥

स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः । भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम् ॥ ४-३ ॥

तू माझा भक्त आणि प्रिय सखा आहेस. म्हणून तोच हा पुरातन योग आज मी तुला सांगितला आहे. कारण हा अतिशय उत्तम आणि रहस्यमय आहे. अर्थात गुप्त ठेवण्याजोगा आहे. ॥ ४-३ ॥

अर्जुन उवाच अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः । कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति ॥ ४-४ ॥

अर्जुन म्हणाला, आपला जन्म तर अलीकडचा; आणि सूर्याचा जन्म फार पूर्वीचा अर्थात कल्पारंभी झालेला होता. तर मग आपणच कल्पारंभी सूर्याला हा योग सांगितला होता, असे कसे समजू? ॥ ४-४ ॥

# ठाण्यात पॉड टॅक्सी धावणार

## - मंत्री प्रताप सरनाईक



ठाणे : जमीनीवरील वाहतुक हवेतून झाल्यास शहरातील वाहतुक कोंडी कमी होणार आहे. त्यामुळे घोडबंदर भागातील भाईंदरपाडा ते विहंग हिल्स चौक पर्यंतचा मार्ग प्रायोगिक तत्त्वावर पॉड टॅक्सीसाठी देण्याचे निश्चित करण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. यासाठी महापालिका किंवा राज्य सरकारचा एकही रुपया खर्च होणार नसल्याचेही त्यांनी सांगितले. मिरा भाईंदर येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते जेपीई हा ६० मीटर रस्ता येथेही पॉड टॅक्सी सुरू करण्याचे निश्चित केल्याचे सरनाईक यांनी सांगितले.

ठाणे शहरात वाहतुक कोडींची समस्या मोठ्याप्रमाणात आहे. घोडबंदर भागातील नागरिकांना या कोंडीचा सर्वाधिक फटका बसतो. या भागात नागरिककरण वाढले असताना रस्त्यांची रुंदी वाढलेली नाही. त्यामुळे रस्ते वाहतुकीवर मोठा भार आलेला आहे. तसेच भिवंडी आणि उरण जेएनपीटीतून सुटणाऱ्या अवजड वाहनांचा भार देखील घोडबंदर मार्गावर अधिक आहे. मागील काही वर्षांपासून ठाणे शहरात मेट्रो मार्गिकेच्या निर्माणाची कामे सुरू आहे. वडाळा-घाटकोपर-कासारवडली या मार्गिकेच्या निर्माणाचे कामे अद्यापही पूर्ण झाले नसल्याने मेट्रो प्रकल्पाच्या प्रतिक्षेत नागरिक आहेत. सरनाईक यांनी ठाणे महापालिकेत अधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला सरनाईक म्हणाले की, पॉड टॅक्सी संकल्पनेला मागील वर्षी 'बीकेसी'मध्ये परवानगी देण्यात आली होती.

# महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



राज्यात महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विद्येचे माहेरघर आणि सुसंस्कृत शहर अशी ओळख असलेल्या पुण्यातील गजबजलेल्या आणि सर्वाधिक वर्दळ असणाऱ्या स्वारगेट बस स्थानकात एका सराईत गुन्हेगार असलेल्या नराधमाने बस स्थानकातच उभ्या राहिलेल्या शिवशाही बसमध्ये एका सव्वीस वर्षीय तरुणीवर बलात्कार केला. स्वारगेट सारख्या वर्दळीच्या बस स्थानकात घडलेल्या या घृणास्पद घटनेने संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे. पुण्यासारख्या देशाच्या सांस्कृतीक राजधानीत आणि विद्येच्या माहेरघरात एका तरुणीची अब्रू लुटली गेल्याने पुण्यासारख्या सुसंस्कृत शहराची मान शरमेने खाली झुकली आहे. एकेकाळी पुणे हे मुलींसाठी सर्वात सुरक्षित शहर समजले जात होते मात्र मागील काही वर्षापासून पुण्याची ही ओळख पुसली जात आहे. या घृणास्पद घटनेने केवळ पुण्याचीच नव्हे तर पुरोगामी महाराष्ट्राची मान शरमेने खाली झुकली आहे. पुण्यात घडलेली ही महिला अत्याचाराची घृणास्पद घटना ही काय राज्यातील पहिली घटना नाही. दररोजच्या वर्तमानपत्रात महिला अत्याचाराची एक तरी बातमी हमखास वाचायला मिळते. दोन वर्षापूर्वी पहाटे कामावरून घरी परतणाऱ्या एका संगणक अभियंता तरुणीवर रिक्षा चालकाने लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना पुण्यातीलच वानवडी परिसरात घडली होती. त्याआधी मुंबईतील सावित्रीबाई फुले वसतिगृहातील विद्यार्थिनीचा विनयभंग करून सुरक्षा रक्षकाने तिची हत्या केली होती. पुण्यातच एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थिनीची हत्या झाली होती. मुंबईत छत्रपती शिवाजी टर्मिनसहुन वाशिकडे हार्बर रेल्वेने परीक्षेसाठी येणाऱ्या वीस वर्षीय तरुणीवर एका नराधमाने मज्जीद बंदर जवळ धावत्या डब्यातच लैंगिक बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपर्डी येथील निर्भयावर झालेल्या अत्याचाराने तर संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला होता. बदलापुरात चार वर्षीय चिमुरडीवर शाळेतच झालेल्या अत्याचाराने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला होता. बदलापुरची घटना तर मानवतेला काळीमा फासणारी होती. अलीकडच्या काळात महाराष्ट्रात अशा घटनांची मालिकाच सुरू आहे. राज्यात महिला अत्याचाराची घटना घडली सर्वत्र संतापाची लाट उसळते. मोर्चे निघतात. निषेध व्यक्त होतो. इलेक्ट्रॉनिक मिडियात चर्चा होते. प्रिंट मीडियात अग्रलेख लिहिले जातात. राजकीय पक्ष एकमेकांवर आरोपांच्या फैरी झाडतात. शासनाकडून घटनेच्या चौकशीचे आणि पोलिसांकडून आरोपींना कठोर शिक्षा देण्याचे आश्वासन दिले जाते अर्थात घटना घडून गेल्यानंतर आरोपींना पकडुन शिक्षा देण्यापेक्षा महिला अत्याचाराच्या घटना घडूच नये यासाठी पोलिसांनी प्रयत्न करायला हवेत. दिवसाढवळ्या महिलांची अब्रू लुटून त्यांची हत्या करण्याची नाराधमी प्रवृत्ती अलीकडे जोर धरू लागली आहे. दिवसाढवळ्या अशा प्रकारचे गुन्हे करण्याची हिंमत नराधमांमध्ये निर्माण होते याचाच अर्थ या नराधमांना कायद्याचा आणि राज्यातील सुरक्षा यंत्रणांचा धाक राहिला नाही. आपण कितीही मोठा गुन्हा केला तरी कायदा आपले काहीही करू शकत नाही. पैशाच्या जोरावर आपण कायदा आणि सुरक्षा यंत्रणांना आपण वाकवू शकतो अशीच धारणा या नराधमांची झाली आहे म्हणूनच ते असे मानवतेला काळिमा फासणारे कृत्य करत आहेत. शिव, शाहू फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या घटना शोभणीय नाहीत. पुरोगामी महाराष्ट्रालाशरमेने खाली मान घालायला लावणाऱ्या या घटना आहेत. महिलांकडे उपभोगी वस्तू म्हणून पाहण्याची पुरुषी मानसिकता वाढू लागली आहे हीच मानसिकता यामागे कारणीभूत आहे. आज राज्यातील कोणत्याच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. शाळा, कॉलेज, कामाचे ठिकाण, सार्वजनिक वाहन, स्वतःचे घर इतकेच काय तर पोलीस स्टेशन देखील महिलांसाठी सुरक्षित नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यासाठी ही लाजिरवाणी बाब आहे. पूर्वी अशा घटनांसाठी बिहार आणि उत्तरप्रदेश ही राज्ये प्रसिद्ध होती आता त्यात महाराष्ट्राची भर पडते की काय अशी शंका येऊ लागली आहे. महाराष्ट्राचा बिहार, उत्तरप्रदेश होऊ नये यासाठी सरकारने आणि पोलीस दलाने महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करायला हव्यात तसेच संबंधित गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्या नराधमांना फाशीचीच शिक्षा द्यायला हवी तसे झाले तरच राज्यातील महिला अत्याचाराच्या घटनांना आळा बसेल आणि पुरोगामी महाराष्ट्र ही महाराष्ट्राची ओळख कायम राहील.

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# ठाणे जिल्हा रुग्णालयात बेल्स पाल्सी रुग्णांवर यशस्वी उपचार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे – पक्षाघात (बेल्स पाल्सी) चा झटका आल्यावर अनेकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण होते. परंतू, या आजारावर वेळेवर औषधोपचार आणि फिजिओथेरपी करणे महत्त्वाचे असते. याचे उत्तम उदाहरण ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयात दिसून आले आहे. चेहऱ्याचा पक्षघात (बेल्स पाल्सी) ने त्रस्त झालेल्या पाच रुग्णांवर जिल्हा रुग्णालयात फिजिओथेरपी आणि चांगले उपचार मिळाल्यामुळे हे रुग्ण पूर्णपणे बरे झाले आहेत.

बेल्स पाल्सी हा चेहऱ्याच्या एका बाजूला होणारा तात्पुरता पक्षाघात आहे. यामध्ये चेहऱ्याच्या स्नायूंवर परिणाम होतो, ज्यामुळे डोळा पूर्णपणे बंद होत नाही, तोंड एका बाजूला झुकते, हसताना अडचण येते आणि चव बदलते. हा आजार मुख्यतः फेशियल नर्व्हमध्ये (चेहऱ्याच्या मज्जातंतू) सूज आल्यामुळे होतो. सध्या चेहऱ्याचा पक्षाघात (बेल्स पाल्सी) झालेले अनेक रुग्ण बघायला मिळतात. पक्षाघात झाल्यावर पुढे आपले कसे होणार ही चिंता रुग्णांमध्ये सतावत असते. परंतू, अशा रुग्णांना योग्य उपचार आणि फिजिओथेरपी देऊन पूर्णपणे बरे करण्याचे काम सिव्हिल रुग्णालय करत आहे. गेल्या दोन महिन्यात चेहऱ्याचा पक्षाघत (बेल्स पाल्सी) झालेल्या पाच रुग्णांवर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धिरज माहंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी उपचार झाले असल्याची माहिती फिजिओथेरपीस्ट डॉ. ज्ञानेश्वर सलगर यांनी दिली.

# अनधिकृत इमारतींच्या घोटाळ्याप्रकरणी कर्मचाऱ्यांची चौकशी करून गुन्हे दाखल करा

## उद्धवसेनेची प्रांत अधिकाऱ्यांकडे मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डोंबिवलीतील 65 अनधिकृत इमारतींच्या तोडक कारवाईविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा आक्रमकपणा कायम असून या रेरा घोटाळ्याप्रकरणी खोटे कागदपत्र पुरविणाऱ्या महसूल विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांची चौकशी करून गुन्हे दाखल करण्याची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कल्याण जिल्हाप्रमुख दिपेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे पदाधिकारी व नागरिकांनी कल्याण उपविभागीय अधिकारी विश्वास गुजर यांची भेट घेतली आणि तातडीने न्याय मिळावा यासाठी निवेदन देण्यात आले. या भेटीदरम्यान शिवसेना डोंबिवली



शहर प्रमुख अभिजीत सावंत, प्रकाश तेलगोटे, संजय पाटील, प्रमोद कांबळे आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी फसवणूक करणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई करा, या प्रकरणात खोटे कागदपत्रे, सातबारे तयार करणारे आणि त्यांना मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कठोर गुन्हे दाखल करावेत. या अनधिकृत इमारती उभारणीस जबाबदार असलेल्या विकासक आणि भूमाफियांची चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. फसवणूक झालेल्या नागरिकांना त्वरित न्याय मिळावा यासाठी विशेष तपास यंत्रणा स्थापन करण्यात यावी. भविष्यात असे प्रकार होऊ नयेत म्हणून महसूल आणि महानगरपालिका प्रशासनाने ठोस नियोजन करावे व कठोर उपाययोजना राबवाव्यात आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष अन्यायग्रस्त नागरिकांसोबत ठामपणे उभा आहे. जर प्रशासनाने त्वरित कारवाई करून नागरिकांना न्याय दिला नाही, तर तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा यावेळी जिल्हा प्रमुख दिपेश म्हात्रे यांनी दिला.

## रेसिपी

# बूंदी करी



रोज रोज त्याच त्याच भाज्या बनवून कंटाळा आला की जेवणाला काय वेगळं बनवानं सुचत नाही. तेच तेच खाऊन घरातील मंडळींनाही कंटाळा आलेला असतो. काय भाजी बनवावी असा प्रश्न तुम्हालाही पडला असेल तर तुम्ही झटपट बूंदी करी बनवू शकता. बूंदी करी बनवणे अतिशय सोपे असून त्यासाठी कोणत्याही तयारीची गरज नाही उपलब्ध असणाऱ्या वस्तूंमधून भन्नाट बूंदी करी बनवणे शक्य आहे. चला तर जाणून घेऊया चटकदार बूंदी करी रेसिपी कशी बनवायची.

**बूंदी करी साहित्य**

१०० gm बूंदी बनवा किंवा रेडीमेड घ्या,२५० ग्रॅम ताजे दही,काही पुदिन्याची पाने,२ टोमॅटो,काही कढीपत्ता,२ चमचे बेसन,२ ग्लास पाणी,१ कांदा,२ मिरच्या

**बूंदी करी कृती**

सर्वात आधी थोडी बूंदी बनवा किंवा रेडीमेड घ्या.

प्रथम एक ब्लेंडर जार घ्या आणि त्यात २५० ग्रॅम ताजे दही, काही पुदिन्याची पाने, दोन टोमॅटो, काही कढीपत्ता, दोन चमचे बेसन, २ ग्लास पाणी घाला. मिसळा आणि बाजूला ठेवा.

नंतर एक कांदा, दोन मिरच्या, ५, ६ लसूण आणि बीट रूटचा एक छोटा तुकडा, आल्याचा एक छोटा तुकडा यांची पेस्ट तयार करा. नंतर कढई गरम करा आणि एक सर्व्हिंग स्पून तेल घाला आणि त्यात हिंग, कढीपत्ता, मोहरी घाला. तडतडल्यावर मिक्सरची पेस्ट घाला. चार मिनिटांनंतर त्यात हळद आणि धने पावडर, मिरची पावडर आणि किचन किंग गरम मसाला आणि मीठ घालून छान मिक्स करून तीन मिनिटे भाजून घ्या.नंतर दही आणि बेसनचे मिश्रण घाला. आणि छान मिसळा. सिम फ्लेममध्ये तीन चार उकळीपर्यंत शिजवा.

# 'मी पाठीशी आहे'

## स्वामी समर्थांच्या अस्तित्वाची प्रेरणादायी गाथा

नव्या युगातील स्वामी समर्थांच्या अस्तित्वाची प्रेरणादायी गाथा सांगणारा 'मी पाठीशी आहे' हा चित्रपट येत्या २८ मार्च रोजी चित्रपटगृहात प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आले आहे. या चित्रपटात श्रद्धा, विश्वास आणि अध्यात्माचा अनोखा संगम प्रेक्षकांना अनुभव्हायला मिळणार आहे. दिग्दर्शक पराग अनिल सावंत म्हणतात," मी एक गोष्ट आवर्जून सांगू इच्छितो की, हा चित्रपट कोणीही बनवत नसून हा चित्रपट स्वतःहून घडला आहे. स्वामींनी तो आमच्याकडून घडवून घेतला आहे. आम्ही सगळे निमित्तमात्र आहोत. 'मी पाठीशी आहे' हा चित्रपट अनेक श्रद्धावान व्यक्तीच्या आयुष्यातील प्रेरणादायी अनुभवाचा प्रवास आहे. स्वामी समर्थांनी प्रत्येकाला दिलेला आधार, त्यांच्या अस्तित्वाची अनुभूती यावर आधारित हा चित्रपट प्रेक्षकांच्या मनात खास स्थान निर्माण करून नक्कीच सकारात्मक ऊर्जा देईल.आम्हाला खात्री आहे की, हा चित्रपट प्रेक्षकांच्या नक्कीच पसंतीस उतरेल." ऑफबीट प्रॉडक्शन, नित्य सेवा प्रॉडक्शन आणि वेरा प्रॉडक्शन निर्मित या चित्रपटाचे कथा, संकलन आणि दिग्दर्शन पराग अनिल सावंत यांनी केले असून मयूर अर्जुन खरात, लक्ष्मीकांत गजानन कांबळे, ॲड. शुभांगी किशोर सोनवले, प्रमोद नंदकुमार मांडरे, शितल सोनावणे, ऋतुजा नरेंद्र कदम, अनिल गावंड आणि केतन कल्याणकर या स्वामींच्या सेवेकरांनी निर्मितीची जबाबदारी सांभाळली आहे. संजय नवगिरे, दिलीप परांजपे यांनी चित्रपटाची पटकथा लिहिली असून संजय नवगिरे यांनी चित्रपटाचे संवादही लिहिले आहेत. तर चित्रपटातील गाण्यांना कबीर शाक्य यांना संगीत सेवा करण्याची संधी लाभली आहे. या चित्रपटात सक्षम कुलकर्णी, सतीश पुळेकर, अरुण नलावडे, सुहास परांजपे, वर्षा प्रभु, श्रीकांत पाटील, अश्विनी चवरे, प्रसाद सुर्वे, शितल सोनावणे, सूचित जाधव, श्रद्धा महाजन, राजवीर गायकवाड, वैष्णवी पोटे यांच्या प्रमुख भूमिका असून माधुरी पवार, संदेश जाधव आणि नूतन जयंत हे विशेष पाहुणे म्हणून झळकणार आहेत.




२८ मार्चला होणार प्रदर्शित

### पश्चिम रेल्वेकडून होळी निमित्ताने

# पालिताणा (गुजरात) विषेश गाडी, पण वैतरणा- डहाणू साठी काय ?

## – केदार काळे शिवसेना प्रवक्ते

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : पालघर स्थानकावर वांद्रे टर्मिनस - पालिताणा विशेष गाडीचा अतिरिक्त थांबा देण्यात आला आहे. होळी उत्सवासाठीस पश्चिम रेल्वेने गाडी ( नंबर ०९०९३ /०९०९४) वांद्रे टर्मिनल ते पालिताणा ( गुजरात ) सुरू करण्यात आलेल्या विशेष गाडीला पालघर स्टेशन वर अतिरिक्त थांबा देण्यात आलेला आहे. हि गाडी १० मार्च २०२५ रोजी वांद्रे टर्मिनस वरून सुटणार, ति पालघरल स्टेशनवर संध्याकाळी ६ -५० पोहचेल व नंतर २ मिनिटांनी मार्गस्थ होणार. दिनांक १३ मार्च २०२५ रोजी, पलिताणा ( गुजरात ) येथून येणारी गाडी हि पालघरला सकाळी ५ - २८ येणार वा मिंटांनी मुंबई ला मार्गस्थ होणार.




याबद्दल शिवसेनेचे प्रवक्ते केदार काळे यांनी पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्यांना धन्यवाद देत असून, डहाणू ते वैतरणा या रेल्वे स्टेशन वरून प्रवास करणाऱ्या दैनंदिन रेल्वे प्रवासी यांचाही वरिष्ठ रेल्वे अधिकारी रेल्वे मंत्री महोदय यांनीसहानेभूतीपूर्वक विचार करावा व त्यांच्यासाठी ही अतिरिक्त गाड्या सुरू कराव्यात. फ्लाईंग राणी व बलसाड फास्ट पॅसेंजर चे डबल डेकर कोच बदलून सिंगल डेकर कोच बसवले आहेत. ते अजूनही डबल डेकर केलेले नाहीत. बलसाड फास्ट पॅसेंजरला सीजन तिकीट होल्डर्स साठी जादा डबे बसवलेले नाहीत. अनेक नवीन लोकल गाड्या मागणी प्रलंबित आहेत याकडेही मायबाप रेल्वेने लक्ष द्यावे. असेही केदार काळे यांचे सांगणे आहे.

# जनऔषधी दिवसानिमित्त मोफत आरोग्य शिबीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जनऔषधी दिवस दरवर्षी सात मार्च रोजी साजरा केला जातो. यानिमित्त एक ते सात मार्च असे साप्ताहिक कार्यक्रम साजरे केले जात आहेत. माफक दरात उपलब्ध असलेल्या जेनेरिक औषधींविषयी जनजागृती करण्यासाठी, लोकांना जेनेरिक औषधांची कार्यक्षमता आणि उपयुक्तता समजावून सांगण्यासाठी, जन औषधी केंद्रांमध्ये माफक दरात मिळणाऱ्या या औषधांविषयी लोकांच्या मनात असलेल्या शंका-कुशंका दूर करण्याच्या दृष्टीने ही जनजागृती करण्यासाठी (प्रधानमंत्री भारतीय जनऔषधी परियोजना) जनरिक मेडिकल अंतर्गत वागळे विभाग प्रमुख तथा माजी नगरसेवक एकनाथ भोईर, माजी नगरसेविका एकता भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र संचालक गजानन गायकवाड यांच्या वतीने दि.02 मार्च 2025 रोजी सकाळी 10 ते 4 वाजेपर्यंत व्यंकटेश अपार्टमेंट, रोड नं.22, सावरकर नगर, ठाणे येथे मोफत आरोग्य चिकित्सा व गरजू रुग्णांना मोफत औषध वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे परिसरातील गरजूंनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन गजानन गायकवाड यांनी केले आहे.

# शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षणात मराठी भाषा दिन साजरा

## अभ्यासक्रमातील मराठी भाषेचे स्थान व महत्व यावर केली चर्चा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 नुसार राज्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता विषयाची अंमलबजावणी सुरू आहे. त्यासाठी शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरावरील शिक्षकांची क्षमता बाधंणी होऊन शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीगंत करणे, हा मुख्य उद्देश आहे . त्यानुसार राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक क्षमता वृद्धी 2.0 तालुकास्तरीय प्रशिक्षण दिनांक 11 फेब्रुवारी 2025 ते दिनांक 1मार्च 2025 या कालावधीमध्ये जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ठाणे व ठाणे महानगरपालिका शिक्षण विभाग मार्फत आयोजित करण्यात आलेले आहे. इयत्ता पहिली ते पाचवी या इयत्तांना शिकविणाऱ्या



शिक्षकांसाठी ठाणे मनपा शाळा क्र .३८, शांतीनगर, ठाणे येथे सुरू असलेल्या प्रशिक्षणामध्ये मराठी भाषा दिन विषयसाधनव्यक्ती तथा सुलभक वृषाली सावंत यांचे मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला.

यावेळी कवी वि.वा.शिरवाडकर ( कुसुमाग्रज ) यांच्या कविता संग्रहाचे वाचन करण्यात आले. तसेच मराठी विषयातील विविध नामांकित कवी, मराठी भाषेचे महत्व, मराठी भाषेची गरज आणि मराठी भाषेचे अभिजात दर्जा मिळाल्यामुळे वाढलेलं आपलंपण या विषयावरती विषय साधनव्यक्ती तथा सुलभक वृषाली सावंत, प्रशिक्षण समन्वयक निवृत्ती भेरे, दिपक मोराणकर , देवीदास सानप, आरती ठाकूर, अनिल डगळे, संगीता काळभोर, कल्पना सपकाळे व गिरीश गरांडे हे सुलभक यांनी मार्गदर्शन केले.

तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, राज्य अभ्यासक्रम आराखडा- पायाभूत स्तर, राज्य अभ्यासक्रम आराखडा - शालेय शिक्षण, समग्र प्रगतीपत्रक, क्षमता आधारीत मूल्यांकन, क्षमता आधारीत अध्ययन अध्यापन प्रक्रिया, क्षमता आधारीत मूल्याकंनाची कार्यनीती, प्रश्न निर्मितीचे प्रकार, क्षमता आधारीत प्रश्न निर्मिती कौशल्ये, उच्च स्तरीय विचार प्रवर्तक प्रश्न, या विषयावर या प्रशिक्षणामध्ये मार्गदर्शन व चर्चा करत असताना त्यामध्ये मराठी भाषेचे असलेले स्थान आणि दर्जा याची आवर्जून ओळख करून देण्यात आली. यावेळी १६२ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.



# वीज कर्मचाऱ्यांची कोट्यवधींची पी.एफ. रक्कम धोक्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : राज्यातील तिनही वीज कंपन्यांतील किमान नव्वद हजार वीज कर्मचाऱ्यांचा स्वतंत्र चालविला जाणारा तेरा हजार कोटीचा पी. एफ. ट्रस्ट भ्रष्ट विश्वास्तांमुळे आज धोक्यात आला आहे. आज मितीला सदर ट्रस्ट चा तोटा हा जवळपास दोन हजार कोटीच्या घरात असून, तो दिवसेंदिवस वाढत आहे,त्यामुळे वीज कंपन्यांतील नव्वद हजार वीज कर्मचाऱ्यांची कुटुंबे उघड्यावर पडण्याच्या भीतीने हवालदिल झाली आहेत.

महिना अखेर पगारापोटी कपात होऊन येणारी पी.एफ. ची रक्कम ही योग्य व आर.पी.एफ.सी. च्या नियमात बसणाऱ्या सक्षम वित्तीय संस्थेत न गुंतवल्याने हा तोटा होत आहे. याला वीज प्रशासन व सहा वीज कामगार संघटनांचे मनमानी गुंतवणूक करणारे विश्वस्त जबाबदार आहेत. या विश्वस्तांनी जाणून बुजून केलेल्या अक्षम्य चूकीमुळे हे संकट

### नव्वद हजार विज कामगारांची कुटुंबे उघड्यावर पडण्याची भीती

उभे राहिले आहे. त्यामुळे या विश्वास्तांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी आमदार भाई जगताप यांनी केली आहे. ज्या वित्तीय संस्था आरपीएफसीने घालून दिलेल्या गुंतवणुकी संबंधीच्या नियमात बसत नव्हत्या, या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करून वीज कर्मचाऱ्यांची कुटुंबाची भविष्याची ठेव, जाणून बुजून ट्रस्टच्या विश्वस्तांनी या कंपन्यांमध्ये गुंतविली आहे. यात सरळ भ्रष्टाचार दिसत असल्याने संबंधित विश्वास्तांवर गुन्हे दाखल होणे गरजेचे झाले आहे. या विश्वस्तांच्या कारभाराबाबत संघटनेचा व वीज कामगारांचा संशय अधिकच बळावला आहे. त्यामुळे हि ट्रस्ट ईपीएफओला जॉईन करणे क्रमप्राप्त आहे. अन्यथा नव्वद हजार वीज कामगारांची कुटुंबे आपल्या भविष्या साठीची बचत गमावून बसतील. याविरूध्द आमदार भाई जगताप लवकरच येणाऱ्या अधिवेशनात आवाज उठवणार आहेत.

## कल्याण तालुक्यातील आपटी बाऱ्हे येथे नवीन अंगणवाडीची उभारणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण तालुक्यातील आपटी बाऱ्हे येथे श्रीमती पी एन दोषी कॉलेज घाटकोपर व केंद्र सरकारच्या उन्नत भारत अभियान तसेच MUFG या संस्थेच्या CSR च्या निधीतून गावातील जुन्या अंगणवाडीला जमीनदोस्त करून नवीन अंगणवाडीची प्रशस्त इमारत उभारणीचा नारळ फोडण्यात आला ; तसेच गावातील रस्त्यांवर १८ सौरदिवे बसवण्याचे काम आज दिनांक गुरुवार २७/२/२०२५ रोजी करण्यात आले. सदर सामाजिक कार्यक्रमात प्रमुख अतिथी प्रा .डॉ .आशा मेनन, श्रीमती दीपिका हरेश ,श्री निपुन मुदलियार , डॉ. विनोद झालटे सर ,आपटी गावच्या सरपंच गीता शिसवे , उपसरपंच कमलाकर भेरले ,ग्रामसेवक नितीन चव्हाण, श्री राजू चव्हाण, अंगणवाडी सेविका रंजना राजेंद्र केणे उपस्थित होते. सदर संस्था व महाविद्यालय यांचा अजेंडा हा नेहमी लोकहिताचा असून दुर्गम गावांमध्ये सौरदिवे लावून नागरिकांना सर्पदंश होऊ नये, तसेच शैक्षणिक वाटचालीसाठी गावांना आर्थिक सहाय्य करणे हे आहे. या संस्थेने जवळपासच्या पाच गावांमध्ये यामध्ये रोहन, आपटी बाऱ्हे, आडीवली, दहिवली ,आणे या गावांमध्ये ७१ सौरदिवे लावण्याचे कार्य पूर्ण केले आहे. ग्रामसेवक नितीन चव्हाण यांनी सर्वांचे आभार व्यक्त करत कार्यक्रम संपन्न झाला असे जाहीर केले.



## केडीएमसीकडून 62 अनधिकृत नळ जोडण्या खंडीत

महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांचे निर्देशानुसार व शहर अभियंता अनिता परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली कल्याण (पूर्व) विभागाला जाणा-या पाणी पुरवठा मुख्य जलवाहिनीवरील दुर्गाडी किल्ला ते सर्वोदय सोसायटी दरम्यान तबेला धारकांनी घेतलेल्या अनधिकृत नळ जोडण्या पोलीस बंदोबस्तात खंडीत करण्याची धडक कारवाई आज करण्यात आली.या कारवाईत 1/2" व्यासाच्या 3 नळ जोडण्या, 1" व्यासाच्या 26नळ जोडण्या, 1 1/2" व्यासाच्या 31नळ जोडण्या व 2" व्यासाच्या 2 नळ जोडण्या अशा एकुण 62 अनधिकृत जोडण्या खंडीत करण्यात आल्या.

# अभिलेख वर्गीकरणासाठी जिल्हा परिषदेत शनिवार, रविवारीही कामकाज

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे ; दि. २८** - "क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा" या विषयावर मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य शासनाच्या प्रशासनिक विभागांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. त्याच धर्तीवर जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत कार्यालयांकरिता १०० दिवसांचा ७ कलमी कृती आराखडा प्रभावी कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या विशेष मार्गदर्शनाने कामकाज करण्यात येत आहे.

स्वच्छतेसाठी विशेष मोहिम जिल्हा परिषदेत राबविण्यात येत असून जिल्हा परिषदेच्या अभिलेख कक्षातील प्रचलित नियम, कार्यपद्धतीप्रमाणे शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये निंदणीकरण, नष्टीकरण व निर्लेखनाची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. याअंतर्गत कार्यालयांमधील अभिलेख निंदणीकरण करण्यात येत आहे. तसेच, सर्व अभिलेखांचे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.९/१८(र.-व-का.), दिनांक १५.०२.२०१८ अनुसार वर्गीकरण करण्यात येत असून कार्यालयांमधील जुन्या व



निरुपयोगी जडवस्तूंची (उदा. संगणक, टेबल, खुर्च्या, कपाटे, इत्यादी) विहित कार्यपद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी अधिकारी व कर्मचारी कामकाज करत आहेत. जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात आज, सुमारे ३०० अधिकारी-कर्मचारी उत्स्फूर्तपणे या मोहिमेत सहभागी झाले आहेत. तसेच सर्व पंचायत समिती येथील कार्यालत देखील अभिलेख वर्गीकरण करण्यात येत आहे.

आगामी १०० दिवसांमध्ये १) संकेतस्थळ (Website), २) सुकर जीवनमान (Ease of Living), ३) स्वच्छता (Cleanliness), ४) जनतेच्या तक्रारींचे निवारण (Grievance Redressal), ५) कार्यालयातील सोयी व सुविधा (Amenities at work place), ६) गुंतवणूक प्रसार (Investment promotion), ७) क्षेत्रीय कार्यालयांना भेटी (Field visits) या मुद्यांवर प्रभावी कार्यवाही जिल्हा परिषदेत कार्यालयांमध्ये या कृती आराखड्याची तत्परतेने अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी सुट्टीच्या दिवशी शनिवार, दि. १ मार्च, २०२५ व रविवार, दि. २ मार्च २०२५ रोजी देखील अधिकारी व कर्मचारी अभिलेख वर्गीकरण करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. या कामासाठी जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांसमवेत मैल कामगार यांच्या मदतीने कामकाज करण्यात येत आहेत.

हा १०० दिवसांचा ७ कलमी कृती आराखडा दि.१५ एप्रिल २०२५ पर्यंत यशस्वीपणे राबवून घेण्यासाठी विशेष मोहिम जिल्हा परिषदेत राबविण्यात येत आहे. यासाठी संकेतस्थळ हे जनतेशी संवाद साधणारे असावे जेणेकरून नागरिकांना त्यांच्या प्रश्नांचे निराकरण ऑनलाइन होईल या उद्देशाने जिल्हा परिषदेचे संकेतस्थळ नागरिकांना हाताळण्यासाठी सोईचे तसेच अधिक माहिती देण्यासाठी तयार करण्यात येत आहे. प्रत्येक विभागाने नागरिकांची सनद आपल्या कार्यालयाबाहेरील दर्शनी भागात लावण्यात येत आहे. कागदविरहित प्रशासनावर भर देणारी ई–ऑफिस प्रणालीच्या माध्यामाचा वापर करण्यात येत आहे, अशी माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) अविनाश फडतरे यांनी दिली.

# माय मराठी प्रतिष्ठानच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन साजरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पश्चिमेतील योगीधाम परिसरात माय मराठी प्रतिष्ठानच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला . संपूर्ण कल्याण शहरात फक्त माय मराठी प्रतिष्ठान संस्थेकडून मराठी भाषा गौरव दिन मोठ्या प्रमाणात योगीधाम चौकात साजरा करण्यात येतो.

कवी कुसुमाग्रज वि.व.शिरवाडकर यांच्या जयंती निम्मित योगीधाम चौक येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. माय मराठी प्रतिष्ठान संस्थेमार्फत मराठी भाषेचे जतन होणेसाठी मराठी सण साजरे केले जाते तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात.



मागील आठवड्याचं माय प्रतिष्ठानचे वतीने पाठपुरावा करून एका महिन्यातच योगीधाम परिसरात २४ तास सुरु राहणारी पोलीस चौकी पोलीस उप आयुक्त यांच्या हस्ते उदघाटन करून सुरु करण्यात अली. शेखर ढेंगळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी माय मराठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन जाधव,सचिव अतुल सरगर, खजिनदार जितेंद्र सावंत, उप अध्यक्ष संदीप अंतरे, उप खजिनदार चेतन निकम, सह सचिव विशाल यशवंतराव, सल्लागार अनघा देवळेकर, पदाधिकारी पंकज ठाकरे, संजीव गायकवाड, वैशाली गरुड, प्रमोद गायकवाड, रुपेश सावंत, उमेश वाघ, दिलीप सोनावणे, अनिल जगताप, एन.डी. देशमुख, सुधाकर कुंभार, डॉ. गेडाम, वरिष्ठ नागरिक संघ अध्यक्ष दिलीप गांगुर्डे, विठ्ठल कदम, गाडे, विनोद वीरकर, देवपूरकर, ललित घाटकर, डॉ सिद्धार्थ घटविसावे, बन्सी भंडारे, अडकित्ते, सुनील परमार आदी मान्यवरांनी परिश्रम घेतले.

# कल्याण पूर्वेतील विकासकामांना गती

## आ. सुलभाताई गायकवाड यांची आयुक्तांसोबत बैठक




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : विकासकामांना गती येणार!आज कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त मा. डॉ. इंदुराणी जाखड यांच्यासमवेत त्यांच्या कार्यालयात महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत मतदारसंघातील प्रलंबित विकासकामे तसेच नागरिकांच्या तातडीच्या समस्या यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.प्रामुख्याने खालील मुद्यांवर सकारात्मक चर्चा झाली. यावर माननीय आयुक्तांनी त्वरित उपाययोजना करण्याचे आदेश संबंधित विभागांना दिले. तसेच, पाणी चोरी करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याचे निर्देश. अनधिकृत बांधकामांना आश्रय दिला जाणार नाही आणि त्यावर तत्काळ तोडक कारवाई केली जाईल. प्रशासनातील कोणताही अधिकारी/कर्मचारी जबाबदारी पार पाडत नसेल, तर त्यांच्यावर कडक कार्यवाही केली जाईल.ही बैठक नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरली असून, यामुळे लवकरच विकासकामांना गती येईल. प्रशासनाच्या सकारात्मक प्रतिसादामुळे नागरिकांच्या समस्या लवकरच मार्गी लागतील.

### चर्चेतील ठळक मुद्दे

- "यू-टाईप" रस्ता (तिसगाव नाका ते काटेमानिवली नाका) – बाधित नागरिकांचे पुनर्वसन करून रस्त्याच्या कामाला तातडीने सुरुवात करण्याची मागणी.
- पाणीटंचाई समस्या – चिंचपाडा, आशेळे, द्वारली, माणेरे, नांदिवली आणि वसार या भागातील पाणीपुरवठ्याच्या समस्या सोडवण्यासाठी त्वरित उपाययोजना करण्याचे निर्देश.
- अनधिकृत बांधकामांवर कारवाई – आरक्षित भूखंडांवरील अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाई आणि 100 फुटी रोड लगतच्या भूखंडाचे अधिग्रहण करून आधुनिक रुग्णालय व क्रीडासंकुल उभारणीसाठी प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करण्याचे ठरवले.
- शिवस्मारक उभारणी – कर्मवीर दादासाहेब गायकवाड क्रीडांगण येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य शिवस्मारक उभारण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची सूचना.
- विहिरी, तलाव व नाल्यांची स्वच्छता – कल्याण पूर्वेतील सर्व जलस्रोत व नाले स्वच्छ करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्याचे निर्देश.

जिल्हा आरोग्य प्रशासन आणि जीवनदीप महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने

# गोवेली ग्रामीण रूग्णालयात 'कुष्ठरोग जनजागृती साठी मॅरेथॉन'






दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**दि.२८, टिटवाळाः** जिल्हा परिषद ठाणे आरोग्य विभाग, पंचायत समिती कल्याण, सहाय्यक संचालक आरोग्य सेवा कुष्ठरोग ठाणे व जीवनदीप कनिष्ठ महाविद्यालय गोवेली यांच्या संयुक्त विद्यमाने गोवेली ग्रामीण रूग्णालय येथे 'कुष्ठरोग जनजागृती अभियान' अंतर्गत 'Run for Leprosy मॅरेथॉन' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी मा.डॉ.गंगाधर परगे (जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. ठाणे), मा.डॉ.गीता काकडे (सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा कुष्ठरोग, ठाणे), मा.श्री. संजय भोये (गट विकास अधिकारी, पंचायत समिती कल्याण),मा.डॉ.भारत मसाळ (तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती कल्याण), मा.डॉ. दिपलक्ष्मी मेश्राम (वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रूग्णालय, गोवेली), मा.श्री. रविंद्र घोडविंदे (अध्यक्ष, जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई), मा. सौ.पूजा जाधव (सरपंच, गोवेली ग्रामपंचायत), मा.श्री राजू मगर (सरपंच, घोटसई ग्रामपंचायत), मा.श्री. प्रकाश रोहणे (प्राचार्य, जीवनदीप क.म.वि. गोवेली) आदी मान्यवर उपस्थित होते.मान्यवरांच्या उपस्थितीतहिरवा झेंडा दाखवून प्रथम मुलांची व नंतर मुलींची ३ कि.मी. च्या मॅरेथॉन स्पर्धेला सुरुवात झाली. आरोग्य विभागाचे सर्व कर्मचारी, आशा सेविका व टिटवाळा पोलिस यांच्या सहकार्याने मॅरेथॉन यशस्वीरीत्या पार पडली.

या मॅरेथॉन स्पर्धेत मुलांमध्ये १) प्रथम क्रमांक:कु.आकाश हिंदोळे, २) द्वितीय क्रमांक: कु.ओमकार टेंभे, ३) तृतीय क्रमांक: कु.भावेश टेंभे यांनी पटकावला. तर मुलींमध्ये १) प्रथम क्रमांक: कु. पुनम सुनील शेलार, २) द्वितीय क्रमांक: कु. रोशनी मनोहर, ३) तृतीय क्रमांक: कु. जान्हवी सुनील गायकर यांनी पटकावला.आरोग्य विभागाच्या वतीने विजेत्यांना प्रथम पारितोषिक ४००० रू, पदक व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक २५०० रू., पदक व प्रमाणपत्र, तृतीय पारितोषिक १५०० रू., पदक व प्रमाणपत्र देण्यात आले.

तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना टी शर्ट व नाष्टा पुरविण्यात आला. या प्रसंगी सहाय्यक संचालक मा.डॉ. गीता काकडे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच सध्या आरोग्य विभागाच्या अथक परिश्रमामुळे कुष्ठरोग जवळ जवळ नामशेष होण्याच्या मार्गावर आहे व सन २०२८ पर्यंत कुष्ठरोगाला हद्दपार करू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भारत मासाळ यांनी समारोपाच्या भाषणात सहभागी सर्व विद्यार्थी, आरोग्य विभागातील सर्व कर्मचारी, आशा सेविका, पोलिस प्रशासन व जीवनदीप कनिष्ठ महाविद्यालय गोवेली यांचे आरोग्य विभागाच्या वतीने आभार मानले.

## कचरा डब्यांच्या चोऱ्या नागरिक त्रस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डोंबिवली एमआयडीसी निवासीत सद्या रहिवाशी सोसायट्या आवारात ठेवलेले कचऱ्याचे प्लास्टीक डबे चोरीस जाण्याचे प्रकार वाढले असून काहींचे एकदा नाही तर तीनतीन वेळा हे सुका व ओला कचऱ्याचे प्लास्टीक डबे चोरीस गेल्याने रहिवाशी त्रस्त झाले आहेत. या एवढ्याशा कारणाने पोलीस तक्रार करावी तर पोलीस पण त्यांना वॉचमन आणि सीसी कॅमेरा आहेत का असे प्रश्न विचारतील म्हणुन तक्रार न केली बरी असे रहिवाशी सोसायटी मधील नागरिक विचार करतात. विशेष म्हणजे जेथे सीसी कॅमेरे नाहीत तेथेच हे डबे चोरीस जात आहेत. काहीनी यावर उपाय म्हणुन हे कचऱ्याचे डबे यासाठी कुलूप बंद ग्रिल बॉक्स बनविले आहेत किंवा साखळदंडाने बांधत आहेत. मात्र हे कचरा डबे चोरणारी भुरट्या गँग कोण असावी याबद्दल काहींकडे संशयाने पाहिले जात आहे. पहाटे साडेचार पाच दरम्यान काही भंगार वेचक महिलांचा समूह पोती घेवून फिरत असल्याचे दिसत आहे. निवासी भागातील ओम सदिच्छा (RH 119), ओमकार छाया (RH 120) इत्यादी बऱ्याच सोसायट्यांच्या कचऱ्याचे डबे चोरीस गेले आहेत. पाण्याचे मिटर, ड्रेनेज चेंबर्स वरील झाकणे इत्यादी चोरीस जाण्याचे प्रकार पण वाढले असून या सर्व भुरट्या चोरट्यांचा बंदोबस्त पोलिसांनी करावा यासाठी येथील रहिवाशी संघटना व सर्व राजकीय पक्ष प्रतिनिधी हे पोलिसांना पत्र देवून भेटणार आहेत.

# सकल सुवर्णकार समाज वधू वर मेळाव्याचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण- लग्नासाठी इच्छूकांना एकाच छताखाली अनुरूप स्थळ मिळून पैसा आणि वेळ वाचावा ह्या हेतूने सकल सुवर्णकार ( सोनार ) समाज वधू वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून जास्तीत जास्त सोनार बांधवांनी लाभ घ्यावा असे आवाहन आवाहन अनिल काकडे यांनी केले आहे.

कल्याण पश्चिम येथे महापालिका मुख्यालयासमोरील स्वामीनारायण हॉल येथे रविवार २ मार्च रोजी सकाळी १० ते २ वाजेपर्यंत सकल सोनार समाज वधु वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. आयुष मॅट्रिमोनीच्या विद्यमाने ह्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विजय विसपुते यांच्या हस्ते करण्यात येणार असून अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रविण विंचुरकर उपस्थित राहणार आहेत. सकल सोनार समाजासाठी ह्या वधू वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून सोनार समाजातील प्रत्येक शाखेतील बांधव ह्या मेळाव्याचा लाभ घेवू शकतो . प्रमुख पाहुणे समाजातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून अधिक माहितीसाठी आयोजक अनिल काकडे मोबाईल 9324552963 / 8104211818 क्रमांकावर संपर्क साधावा .

## जाहिर नोटीस

या नोटिसीद्वारे तमाम नागरिकांना कळविण्यात येते की मुरबाड नगरपंचायत हद्दीतील मालमत्ता क्रमांक 3588 /क्षेत्र-2112 ही मालमत्ता श्री. दाजी मारूती शिंगोळे यांच्या नावे मुरबाड नगरपंचायत दप्तरी नोंद आहे. परंतु सदर मालमत्तेची वाटणी करायची असून आता तिचे चार हिस्से करायचे आहेत. ते या प्रमाणे :-

3588/अ स्वतः श्री. मारूती दाजी शिंगोळे,3588 /ब पत्नी सौ.संगिता दाजी शिंगोळे, 3588/ क व ड मुलगा श्री.महेश दाजी शिंगोळे तसेच 3588/ई मुलगी कु. प्रियंका दाजी शिंगोळे यांच्या नावे मुरबाड नगरपंचायत दप्तरी नोंद करावयाचे आहे.

तरी सदर मिळकतीस या व्यतिरिक्त अन्य कोणाला हरकत घ्यायची असल्यास त्यांनी आजपासून म्हणजे नोटिस निघाल्या पासून ७ दिवसांच्या आत मा.नगरपंचायत ,मुरबाड येथे हरकत घ्यावी. तद्नंतर आलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही.

महाराष्ट्र नगर पंचायत/नगरपरिषद औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 130 अन्वये सदर मिळकत वरिल प्रमाणे माझे व माझे वारसंचे नावे करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आपला
श्री. दाजी मारूती शिंगोळे

# इमॅजिका पार्कला जाणाऱ्या सर्व सहली रद्द

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /
नवी मुंबई : नवी मुंबई महापालिका शाळेतील सहलींदरम्यान एका १३ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्यानंतर पालिका प्रशासनाने नववी तसेच दहावीच्या बोर्डाच्या परीक्षा झाल्यानंतर याच इमॅजिका पार्क येथे जाणाऱ्या जवळजवळ ६२०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या सहली रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. सहलीदरम्यान पालिका अधिकारी, कंत्राटदार यांचा गलथान कारभार घणसोली शाळा क्रमांक ७६ मधील आठवीत शिकणाऱ्या आयुष सिंग या विद्यार्थ्याच्या मृत्यूच्या निमित्ताने चव्हाट्यावर आला आहे. शैक्षणिक सहलींबाबत राज्य सरकारची विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वे असताना ते नियम डावलून इमॅजिका पार्क येथे पालिका शाळेने सहल आयोजित केली होती. शिवाय यापुढील अनेक सहलींचे नियोजनही याच ठिकाणी केले होते.पालिकेच्या माध्यमिक विभागाच्या नववी, दहावीच्या परीक्षा झाल्यानंतर जवळजवळ ६२०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांच्या सहली इमॅजिका पार्कला जाणार होत्या. मुलांच्या परीक्षा झाल्यानंतर त्यांना शाळेत बोलवून सहलींचे आयोजन करण्यात आले होते. मात्र या घटनेनंतर पालिका प्रशासनाला खडबडून जाग आली असून यापुढील इमॅजिका पार्कच्या सर्व सहली रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, याबाबत नवी मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिल्लारे यांना संपर्क केला असता संपर्क झाला नाही.

# उल्हासनगरात 'हम बोलते है मराठी' उपक्रम

## अमराठी व्यक्तींनी गायिले मराठीत मराठीचे गुणगान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
उल्हासनगर : उल्हासनगर हे कॉस्मोपॉलिटी यन शहर. एकेकाळी मिलिटरी कॅम्पच्या या शहरात पाकिस्तानातून विस्थापित झालेला सिंधी व्यापारी वर्ग व देशाच्या विविध प्रांतातून आलेला कामगार वर्ग येऊन विस्तारला आहे. या शहरात मराठी बहुल भाषिकांची संख्या अधिक आहे. उल्हासनगरात ६० वर्षांपासून एकत्र राहत असलेले इतर भाषिकही ईथे अस्खलित मराठीत बोलतात. अशा अमराठींनी अभिमानानं मराठीचं गुणगान यावेळी केलं. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले कायद्याने वागा लोक चळवळीचे प्रणेते राज असरोंडकर यावेळी म्हणाले की, अमराठी भाषिकांनी मराठी बोलतांना कोणताही संकोच न बाळगता आत्मविश्वासाने मराठी आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मराठी ही प्रशासकीय आणि राज भाषाच नाही तर आंतर संवादाची ही महत्त्वाची प्रक्रिया आहे. मराठी ही प्रमाणाची भाषा न मानता एकमेकांच्या भावना व्यक्त करण्यासाठी या शहरात मराठीचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. मात्र, ईतर अमराठीं वर बळजबरी करणाऱ्या मराठी माणसांनी मराठीचं स्वतः सकस संवर्धन करायला हवं.




मराठी राजभाषा दिनानिमित्त उल्हासनगरातील गंगोत्री वेल्फर फाउंडेशनने मराठी भाषा उत्सवाचं आयोजन केलं होतं. यावेळी संघटनेचे प्रवक्ते अरविंद वाजपेयी ,सामाजिक कार्यकर्ते शशिकांत दायमा, बलबिंदर सिंग, उद्योजक रतन लालवानी या उल्हासनगरात मराठी भाषिकांच्या सानिध्यात राहून आत्मसात केलेल्या अनेक अमराठी नागरिकांनी दर्जेदार मराठीत आपल्या भावना व्यक्त केल्या. एकेकाळी कर्नाटक , कानपूर ते झाशीपर्यंत महाराष्ट्राच्या सीमा होत्या. त्यामुळे मराठी केवळ महाराष्ट्राच्या अनेक राज्यांच्या सीमा ओलांडून गेलेली भाषा आहे. तिचं जतन व्हावे. अशी भावना वाजपेयी यांनी व्यक्त केली. तर मराठी भाषा टिकवायची असेल तर मराठी शाळा टिकवणे ही काळाची गरज असल्याचंही दायमा यांनी सांगितले. यावेळी निता इंगळे , प्रिया गायकवाड, निळकंठ थोरात यांनी मराठी गाणी सादर केली. तर, या कार्यक्रमाच्या अध्यक्षा सोनिया धामी यांनी मराठीमध्ये शुभेच्छा देत गुरुनानक आणि संत नामदेव यांचा सहसंबंध स्पष्ट केला. गंगोत्री वेल्फेअर फाऊंडेशनचे सचिव व उल्हासनगर महानगरपालिकेचे माजी सभापती सभागृहनेता भरत गंगोत्री यांनी मराठी भाषा उत्सवाचा आयोजन केलं होतं. यापुढेही मराठीच्या संरक्षण आणि संवर्धनाकरिता गंगोत्री वेल्फेअर फाऊंडेशन नेहमी अग्रेसर असेल असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## सात कलमी कार्यक्रमामध्ये

# पालघर पोलीस दल राज्यात प्रथम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पालघर : मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचा १०० दिवसाच्या ७ कलमी कार्यक्रम हा संपुर्ण महाराष्ट्रात राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पालघर पोलीस दलाकडून जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रात सदर ७ कलमी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या १०० दिवसाच्या ७ कलमी कार्यक्रमामध्ये १. वेबसाईट, २. सुकर जीवनमान, ३. स्वच्छता, ४. तक्रार निवारण, ५. कार्यालयीन सोई सुविधा, ६. आर्थिक व औद्यागिक गुंतवणुकीस प्रोत्साहन, ७. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी इत्यादी विषय आहेत. पालघर जिल्हा पोलीस दलाने पोलीस प्रशासन लोकाभिमुख व गतीमान करताना वेबसाईट अद्ययावत करून User Friendly बनवली, नागरिकांसाठी Chat Box सुविधा, सुकर जीवनमान



अंतर्गत सायबर सुरक्षित पालघर मोहिम, Al based Chat Bot, स्वच्छता मोहिम, तक्रार निवारण दिन, ई-ऑफिस कार्यप्रणाली, Visitor Management System, कार्यालयीन कामकाजामध्ये AI चा वापर, पेट्रोलिंगवर देखरेखीसाठी थर्ड आय ॲप्लीकेशन असे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले आहेत.

७ कलमी कार्यक्रमाअंतर्गत पहिल्या ५० दिवसाच्या आढाव्यात पोलीस विभागातील पालघर जिल्हा पोलीस दलाने महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्या अनुषंगाने दि.२७/०२/२०२५ रोजी सह्याद्री अतिथी गृह, मुंबई या ठिकाणी मा. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा. श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मा. श्री. अजित पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे उपस्थितीत सादरीकरण पार पडले. सदरवेळी मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या शुभहस्ते मा. श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आलेले आहे. सदरचा ७ कलमी कार्यक्रम हा बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या संकल्पनेतुन व मार्गदर्शनाखाली सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व अंमलदार तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी यशस्वीरित्या राबविला आहे.

## संक्षिप्त

### जिल्हा परिषदेच्या कामांचे वाटप पूर्ण



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पालघर : पालघर जिल्हा परिषदेच्या जिल्हा कामवाटप समितीच्या वतीने 27 फेब्रुवारी रोजी कामवाटप सभेचे आयोजन करण्यात आले. यासाठी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांनी मंजुरी दिलेली 10 लाख रुपयांपर्यंतची एकूण 215 कामे बांधकाम विभागाच्या कार्यालयाच्या नोटीस फलकावर ठळकपणे प्रकाशित करण्यात आली होती.

जिल्हा कामवाटप समितीचे अध्यक्ष, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच सचिव व कार्यकारी अभियंता जागृती संखे यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही सभा हुतात्मा सभागृह, जिल्हा परिषद, पालघर येथे पार पडली.

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंते आणि मजूर कामगार सहकारी संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने या प्रक्रियेत सहभागी झाले. पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने लॉटरी प्रक्रियेच्या माध्यमातून एकूण 215 विकासकामांचे वाटप करण्यात आले.या प्रक्रियेमुळे जिल्ह्यातील अभियंते आणि स्थानिक सहकारी संस्थांना संधी मिळाली असून, विकासकामे वेगाने आणि न्याय्य पद्धतीने पूर्ण होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### जलजीवन मिशनच्या कारभाराविरोधात उपोषण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड : २००६ ते २०२५ या कालावधीत शासनाने चार योजना राबवुन राज्यातील पाणी टंचाई दुर करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या योजना फक्त कागदावरच राहून महाराष्ट्र मात्र तहानलेलाच राहिला. या मध्ये प्रामुख्याने 1)जल स्वराज्य 2)जल युक्त शिवार 3)भारत निर्माण. 4)जल जिवन मिशन या पाणी पुरवठ्याच्या चार योजनेतून शासनाने महाराष्ट्र हंडा मुक्त करण्यासाठी करोडो रुपये खर्च केले गेले. सोळा वर्षाच्या कालावधीत चार योजना झाल्या. तरीही महाराष्ट्र हंडा मुक्त किंवा टॅंकर मुक्त झाला नाही. जनतेचा पैसा अक्षरशा ठेकेदार आणि अधिकारी यांनी खोऱ्याने ओढला. महाराष्ट्रातील समस्त महिलांची फसवणूक करून सर्व योजनांचे वाटोळे लावले. आजही ठाणे जिल्ह्यातील सर्व तालुके तहानलेलेच आहेत. पालघर जिल्ह्यातही तिच अवस्था. म्हणुनच जनतेच्या पैशाचा हिसाब मागण्यासाठी दिनांक -०३/०३/२०२५ पासून माहिती अधिकार फेडरेशन महासंघाचे अध्यक्ष सुभाषजी बसवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष शंकरजी वडवले हे जिल्हा परिषद ठाणे येथे आमरण उपोषणास बसणार असुन सदर उपोषणास ठाणे जिल्हा अध्यक्ष अशोक पडवळ यांच्यासह ठाणे पालघर ,मुंबई ,कोकण विभागातील तालुका अध्यक्ष, सर्व पुरूष व महिला कार्यकर्ते शंकरजी वडवले यांचे मनोबल वाढविण्यासाठी व भ्रष्टाचारी प्रशासनास जाग आणण्यासाठी जिल्हा परिषद कार्यालयासमोर सकाळी अकरा वाजता मोठ्या संख्येने उपस्थित राहुन माहीती अधिकार महासंघाचा दणका दाखवुन देणार असल्याचे शहापूर महिला तालुका अध्यक्षा सौ.माया मगर यांनी सांगितले.

# ज्ञानवर्धिनी वाचनालयाच्या वतीने साहित्यिकांचा सन्मान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड : मराठी राजभाषा दिन तथा कुसुमाग्रज जयंतीच्या निमित्ताने ज्ञानवर्धिनी सार्वजनिक वाचनालय शिवळे यांच्या वतीने मुरबाड तालुक्यातील साहित्यिक लेखक यांचा सन्मान सोहळा व विद्यार्थी वाचकांचा गौरव करण्यात आला. तर नुकताच मुंबई आकाशवाणीवर भारतीय शेतीमध्ये आदिवासी संस्कृतीचे योगदान या विषयावर मुलाखत चांगली मुलाखत प्रसारित झाल्याने पत्रकार बाळासाहेब भालेराव यांना शाल श्रीफळ व ट्रॉफी देऊन विशेष सन्मान करण्यात आला.



मराठी भाषा आणि साहित्याच्या संवर्धनात आपले मोलाचे योगदान देणाऱ्या मुरबाड तालुक्यातील जवळपास २५ साहित्यिकांचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी श्रीराम कुलकर्णी, वि वा.यशवंतराव, गिरीश कंटे,योगेंद्र बांगर , एकनाथ देसले , डॉ यशवंत सुरोशे, दिपश्री इसामे, लक्ष्मण घागस, राजकुमार कडव,किसन इसामे, शिवाजी घोलप, अशोक रोठे, राजाराम कापडी, बाळकृष्ण इसामे, रोहिदास भागवत , डॉ सुनील गोंधळी, ललित गाजरे, जयराम कराळे, शरद टोहके, विनोद राऊत यांना सन्मानित करण्यात आले .मुरबाडला मोठी साहित्यिक परंपरा लाभली असून या साहित्यिकांचा आणि त्यांचा लेखनकार्याचा गौरव करण्याचे ज्ञानवर्धिनी वाचनालय संचालक समितीने पुढाकार घेऊन मराठी भाषादिनाचे औचित्य साधत हा उपक्रम राबवला. कथा , कविता, कादंबरी, नाटक , चरित्र, वैचारिक , ललित लेख अशा स्वरूपात लेखन करणाऱ्या लेखकांची पुस्तके वाचनालयाने आपल्या ग्रंथालयात घेऊन त्याचे प्रदर्शनही यावेळी मांडण्यात आले होते. या वर्षात वाचनालयाने विद्यार्थ्यामध्ये वाचन , लेखन कौशल्य विकसित व्हावी म्हणून सुंदर हस्ताक्षर , वक्तृत्व, रसग्रहण , वाचक लकी ड्रॉ अशा स्पर्धा घेतल्या होत्या त्या स्पर्धांचे बक्षीस वितरण या वेळी करण्यात आले .

कार्यक्रमाची सुरुवात कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला अभिवादन करून तसेच गणेश पूजन आणि दीपप्रज्वलन , इशस्तवन करून करण्यात आले . प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी जनसेवा शिक्षण मंडळाचे सहसचिव भास्कर हरड होते तर अतिथी म्हणून वैदकीय अधिकारी डॉ सागावकर, साहित्यिक श्रीराम कुलकर्णी , वि.वा. यशवंतराव , गावातील ज्येष्ठ नागरिक श्रीराम इसामे, शांताराम इसामे , कोमसाप मुरबाडच्या अध्यक्षा दिपश्री इसामे, विद्या मंदिर हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य यशवंत धलपे,पत्रकार बाळासाहेब भालेराव वाचनालयाचे उपाध्यक्ष मनोहर इसामे, कार्यवाह धनाजी दळवी संचालक मंडळ , विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ व रसिक श्रोते उपस्थित होते. “आपली भाषा टिकवण्यासाठी असे उपक्रम राबवणे तसेच आपल्या साहित्य परंपरेचा सन्मान करणे हा वाचनालयाचा स्तुत्य उपक्रम आहे” असे उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रस्तावित वाचनालयाचे कार्यवाह धनाजी दळवी यांनी केले तर सर्वांचे स्वागत उपाध्यक्ष मनोहर इसामे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हरेंद्र सोष्टे यांनी केले.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पेण : पेणमध्ये एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला लग्नाचे अमिष दाखवून भाजपच्या महिला पदाधिकाऱ्याच्या मुलाने तब्बल सहा महिन्यांत अनेकवेळा तिचे शारारिक शोषण करून तिला ठार मारून टाकण्याची धमकी देण्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

भाजप महिला सरचिटणीस आणि जिल्हा शांतता कमिटी सदस्य असणाऱ्या वंदना म्हात्रे यांचा मुलगा मनिष म्हात्रे याने एका १५ वर्षीय मुलीला लग्नाचे अमिष दाखवून सप्टेंबर महिन्यापासून अनेक वेळा शारीरिक उपभोग घेऊन अत्याचार केल्याचा गुन्हा पेण पोलिस ठाण्यात दाखल झाला आहे.

याविषयी सविस्तर वृत्त असे की, यातील पिडीत मुलगी आणि मनिष यांची स्नॅप चॅटवरून मे २०२४ मध्ये ओळख झाली. त्यावर ते एकमेकांशी बोलू लागले. ऑगस्ट २०२४ मध्ये मनिष याने पिडीत मुलीला तु मला आवडतेस मला तुझ्यासोबत लग्न करायचे आहे, असे बोलून तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले.

**आता चित्रा वाघ आवाज उठवणार का?** भाजपच्या नेत्या तथा आमदार चित्रा वाघ हया महिलांच्या अत्याचाराविरुध्द सतत आवाज उठवत असतात. महिलांचा आवाज म्हणून त्या आख्या महाराष्ट्रात सुपरिचित आहेत. मात्र आत्ता त्यांच्याच पक्षाच्या पदाधिकारी महिलेच्या मुलाने १५ वर्षाच्या मुलीवर गेली सहा महिने अत्याचार मुलीवर केला आहे. त्याविरुध्द त्या आवाज उठवून पिडितेल न्याय देणार का? असा सवाल जनसामान्य जनतेला पडला आहे.

विषयाच्या नोटस् घेण्यासंदर्भात ते साई मंदिर पेण येथे भेटले. त्यानंतर सप्टेंबर महिन्यात मनिष याने आपल्या चिंचपाडा येथील शिवानी गृहनिर्माण संस्था येथे घरी बोलावले आणि तिच्या इच्छेविरुध्द तिच्यावर अत्याचार केला.मात्र २३ फेब्रुवारी २०२५ रोजी पीडित मुलीच्या वडिलांसमोर हा प्रकार उघडकीस आला. दरम्यान पोलिसांनी यातील आरोपी मनिष याला ताब्यात घेतले आहे.

# घराला आग : जळून खाक

## नामदार भरत गोगावले यांची कुटुंबाला पन्नास हजारांची मदत



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
बोरघर : दिनांक २७ फेब्रुवारी रोजी नामदार भरत शेठ गोगावले यांनी श्रीवर्धन मतदारसंघात महाशिवरात्रीचे औचित्य साधून धावता दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते यावेळी वडवली येथे कार्यक्रम आटोपून बोर्ली मार्गे जात असताना नुकतेच दोन दिवसापूर्वी शॉर्ट सर्किट मुळे बोर्ली येथील एका ग्रामस्थांचे कौलारू घर जळून खाक झाले होते. घरात एकही वस्तू शिल्लक राहिली नव्हती त्यामुळे ते कुटुंब उघड्यावर आले होते. त्यांना तात्पुरत्या स्वरूपाची का होईना त्वरित मदतीची गरज होती, नामदार भरत शेठ गोगावलेंनी प्रत्यक्ष दर्शी जाऊन पाहिले तर घरात एकही वस्तू अन्नधान्य भांडे शिल्लक नव्हते त्यामुळे ताबडतोब स्वतः 50 हजारांची रोख रक्कम त्यांना मदत म्हणून देण्यात आली त्यावेळी घरमालकांनी आणि ग्रामस्थांनी नामदार भरत शेठ गोगावलेंचे आभार मानले. यावेळी स्थानिक ग्रामस्थांमधून सांगण्यात आले की स्थानिक लोक प्रतिनिधी नुकतेच या ठिकाणाहून गेले पण त्यांनी साधी दूरध्वनी द्वारे किंवा कार्यकर्त्यांकडे प्रत्यक्षदर्शी येऊन भेट सुद्धा दिली नाही, किंवा विचारपूस केली नाही, आपण आमच्या गावातील या दुर्घटनाग्रस्त ग्रामस्थ व्यक्तीस मदत केली त्याबद्दल आपले आभार व धन्यवाद असे सदर ग्रामस्थांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# २५ लाखांची रोकड चोरणाऱ्या चालकाला अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई : वांद्रे येथील एका विकासकाच्या मोटरगाडीत ठेवलेली सुमारे २५ लाखांची रोकड चोरून पळून गेलेल्या आरोपी चालकाला ठाण्यावरून अटक करण्यात खेरवाडी पोलिसांना यश आले आहे. गुरुदेव सुभाष पाटील असे आरोपीचे नाव असून त्याच्याकडून पोलिसांनी २३ लाख ७२ हजार रुपयांची रोख जप्त करण्यात आली आहे. आरोपीविरोधात यापूर्वी धारावी पोलीस ठाण्यात तीन गुन्ह्यांची नोंद असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कविदास जांभळे यांनी सांगितले.नावेद मोहम्मद सिद्धीकी हे विकासक असून वांद्रे परिसरात राहतात. २० फेब्रुवारीला त्यांनी कामानिमित्त कार्यालयात २५ लाख रुपयांची रोकड आणली होती. ती रोकड त्यांनी मोटरगाडीत मागे ठेवली होती. त्यानंतर ते कामानिमित्त वाकोला व नंतर वांद्रे येथील म्हाडा कार्यालयात गेले. यावेळी त्यांच्यासोबत त्यांचा मित्र गौरव अरोरा हा मित्र हादेखील होता. म्हाडा कार्यालयात जाताना त्यांनी गुरुदेवला कारमध्ये २५ लाखांची रोकड असल्याची कल्पना देऊन त्याकडे लक्ष ठेवण्यास सांगितले होते. दुपारी दिड वाजता म्हाडा कार्यालयातील काम संपवून ते त्यांच्या मोटरगाडीजवळ आले. यावेळी तेथे गुरुदेव आणि मोटरगाडी दोघेही नव्हते. त्यामुळे त्यांनी चालकाला दूरध्वनी केले, मात्र त्याने प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर कार्यालयातील एका व्यक्तीला मोटरगाडी इलेक्ट्रीसिटीसमोर उभी असल्याचे सांगितले. त्यांनी पाहणी केली असता मोटरगाडीमध्ये २५ लाखांची रोकड नव्हती. गुरुदेव हा २५ लाखांची रोकड घेऊन पळून गेला होता. त्याने त्याचा मोबाईल बंद होता.

# खा. सुरेश म्हात्रे यांच्या हस्ते दहागांव ग्रामपंचायत कार्यालयाचे उद्घाटन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
वासिंद : येथील दहागांव-कातबाव या ग्रुप ग्रामपंचायतीच्या नविन कार्यालयाचे उद्घाटन भिवंडी लोकसभा खासदार सुरेश म्हात्रे (बाळया मामा) यांच्या हस्ते करण्यात आले.

दहागांव-कातबाव-कातबाव या ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयाचे नविन बांधकाम करण्यात आले आहे. या कार्यालयाचा उद्घाटन सोहळा खासदार सुरेश म्हात्रे यांच्या उपस्थित पार पडला. यावेळी शहापूर आमदार दौलत दरोडा, माजी जि.प. सदस्य मोहन जाधव, खातिवली वासिंद सोसा. माजी चेअरमन जयराम पवार, सरपंच सविता झुगरे, उपसरपंच संजय पवार, रा.कॉं. (शरदचंद्र पवार ) पक्षाचे तालुकाध्यक्ष मनोज विशे, सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष अविनाश थोरात, सतिश पातकर, जेष्ठ कार्यकर्ते लडकू पवार, नागोशेठ मसणे, बाळकृष्ण देसले, बाळासाहेब खारीक, भाई तारमळे, गंगाराम जाधव, त्र्यंबक भांगरे, ग्रामसेवक हिराकांत म्हसकर, राजेंद्र भेरे, संदीप पाटील, राजदिप जामदार, रघुनाथ मसणे, शंकर मसणे, सागर कराळे, विलास धानके, ज्ञानेश्वर मसणे, बाळू लोभी, रविंद्र वावरे आदी पदाधिकारी , कार्यकर्ते व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, ग्रामस्थांना लागणारे जन्म - मृत्यू व इतर महत्वाचे दाखले आवश्यकता असते. त्यामुळे ग्रामपंचायत कार्यालय हे गावातील पवित्र स्थान असतंय, इथूनंच गावाचा खऱ्या अर्थाने विकास होत आहे . ग्रामस्थांच्या या समस्या सोडवून विकास कामांना प्राधान्य द्यावे असे सुरेश म्हात्रे यांनी सांगून या भिवंडी लोकसभा क्षेत्रात ग्रामपंचायत कार्यालय याचबरोबर शाळेचे वर्ग, आरोग्य सुविधा या रखडलेल्या कामांची माहिती द्यावी यांची पूर्तता करुन यासाठी नक्कीच प्राधान्य दिले जाईल असे म्हात्रे यांनी म्हटले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजदिप जामदार, सुत्रसंचालन मुकेश दामोदरे यांनी केले तर यासाठी ग्रामपंचायत समिती, सदस्य व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले होते.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024